**श्री. एस. जी. कोरे, न्यायाधीश, कामगार न्यायालय, सांगली यांचे न्यायालयात**

**तक्रार (यु.एल.पी.) क्र. २७/२०२२**
CNR No. MHLC100001192022

**राजू आप्पासो कुडचे** .. **तक्रारदार**

**विरुध्द**

**सरपंच,**
**ग्रामपंचायत कार्यालय, लिंगनूर व इतर.** .. **जाबदार**

## निशाणी सी–१३ वर आदेश

**(दि. २५/०७/२०२५)**

१. जाबदार यांनी प्रस्तुतचा अर्ज तक्रारदार यांचेकडून कागदपत्रे मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. जाबदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :

जाबदार यांनी तक्रारदार यांच्या अर्जास निशाणी सी–७ अन्वये म्हणणे दाखल केले असून त्यामध्ये तक्रारदार याने तो तात्पुरता कामावर असताना अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागायतदार शेतक–यांच्या नुकसानभरपाई यादीचे संगणकामध्ये फिडींग करून शासनाकडे पाठविताना यादी अ. क्र. ३१ ते २२ मध्ये त्यांचे वडीलांचे नाव, अ. क्र. ८१ वर आईचे नाव आणि अ. क्र. ११६ वर पत्नीचे नाव नोंदवून संगणक डेटा बेकायदेशीरपणे डिलीट केला आहे. तसेच, तक्रारदार यांनी त्यासंदर्भात निशाणी यु–१० वर असंदिग्ध जबाब दिला आहे. सबब, त्या अनुषंगाने तक्रारदार यांचे आई, वडील आणि पत्नीचे नावे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली, शाखा लिंगणूर या बँकेकडे सन २०२२ मधील वर नमूद लाभार्थीचे शासन अनुदान जमा झालेबाबत बँकेचा खातेउतारा मिळणेबाबत मागणी केले असता बँकेने गोपनीय असल्याने सदर कागदपत्रे देता येत नसलेबाबत लेखी कळविले आहे. सबब, सदरची कागदपत्रे हजर करणेसंदर्भात योग्य ते आदेश करणेची जाबदार यांनी विनंती केली आहे.

३. तक्रारदार यांनी अर्जाखाली म्हणणे देवून अर्जास प्रखर विरोध केला आहे. जाबदार यांनी मागणी केलेली कागदपत्रे न्यायदानास मदत करणेस उपयुक्त नाहीत. जाबदार हे तक्रारदार यांचेवर खोटे आरोप करून मानसिक त्रास देवून वेळकाढुपणा करीत आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली.

४. जाबदार व तक्रारदातर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. जाबदारातर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, जाबदार यांनी अर्जात मागणी केलेली कागदपत्रे ही न्यायाच्या दृष्टीने जरूरीची असून त्याव्दारे तक्रारदार यांनी केलेले बेकायदेशीर कृत्य आणि फसवणुक उघडकीस येवू शकते. सबब, अर्जातील मागणीप्रमाणे दस्तऐवज अभिलेखावर आल्यास न्यायास मदत होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

५. तक्रारदार यांचेतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, जाबदार यांनी मागणी केलेली कागदपत्रे ही न्यायदानाच्या कामी उपयुक्त नसून जाबदार यांनी वेळकाढूपणा करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

६. जाबदार व तक्रारदारातर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. जाबदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा तक्रारदार यांचे आई, वडील आणि पत्नीचे नावे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली, शाखा लिंगणूर या बँकेकडे सन २०२२ मधील शासन अनुदान जमा झालेबाबत बँकेचा खातेउतारा मिळणेसंदर्भात दाखल केला आहे. जाबदार यांनी अर्जामध्ये विनंती केलेली कागदपत्रे अभिलेखावर आल्यास न्यायदानाच्या कामी मदत होणार आहे. सदरची कागदपत्रे तक्रारदार यांनी दाखल केल्यास त्यांचे काही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, सदरची कागदपत्रे अभिलेखावर न आल्यास जाबदार यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## –: आ दे श :–

**(१)** निशाणी सी–१३ कडील अर्ज मंजूर करण्यात आला.

(२) तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेली कागदपत्रे पुढील तारखेपर्यंत दाखल करावीत.

(३) खर्चासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

LABOUR COURT MAHARASHTRA

Digitally signed by SACHIN GOURIHAR KORE
Date: 2025.07.25 15:59:39 +0530

स्थळ : सांगली

दिनांक : २५/०७/२०२५

( एस. जी. कोरे )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली.